# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## मुंबईचा किनारपट्टी व्यवस्थापन आराखडा अपूर्ण असल्याबाबत

**(१) ७२ (२१-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईचा किनारपट्टी व्यवस्थापनचा आराखडा (सीझेडएमपी) मागील ३३ वर्षात तीन वेळा तयार करण्यात आला असून त्यामध्ये अनेक त्रुटी व अपूर्णता असल्याचे एका विद्यापीठाने माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास प्रायोजित केलेल्या अभ्यास अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईचा किनारपट्टी व्यवस्थापन आराखडा अपूर्ण असल्याची कारणे काय आहेत तसेच उक्त अभ्यास अहवालात कोणत्या त्रुटी असल्याचे नमूद करण्यात आले आहे व सदर त्रुटी दूर करुन आराखड्यास मंजूरी देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही,

(२) केंद्र शासनाने, दिनांक १९/०२/१९९१ रोजी सीआरझेड अधिसुचना जाहीर केली होती. सदर अधिसूचनेनूसार महाराष्ट्र राज्याचा सीआरझेड नकाशा २७ सप्टेंबर, १९९६ रोजी केंद्र शासनाने मंजूर केलेला होता.

तद्नंतर केंद्र शासनाने, दिनांक ०६/०१/२०११ रोजी नवीन सीआरझेड अधिसूचना जाहीर केली होती. सदर अधिसुचनेअंतर्गत राज्यातील तटीय जिल्ह्याचे सीआरझेड नकाशे २०१८-१९ साली केंद्र शासनाने जाहीर केलेली नवीन सीआरझेड अधिसूचना, १८ जानेवारी, २०१९ लागू असून, सदर अधिसूचनेअंतर्गत सीआरझेड नकाशे हे २०२१-२०२३ साली केंद्र शासनाने मंजूर केले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेतील कनिष्ठ लेखा परिक्षक/रोखपाल पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्याबाबत

**(२) ६८४ (१७-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या गट क संवर्गातील कनिष्ठ लेखापरिक्षक/रोखपाल पदांवर पदोन्नती देताना कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी धारण केलेली बी.ए एम ए तसेच ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हमेंटकडील एल एस जी डी, एल जी एस व डी.एल जी एफ एम इत्यादी शैक्षणिक अर्हता विचारात न घेता सरसकट त्यांना सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त असलेल्या कनिष्ठ लेखापरिक्षक /लेखापाल /रोखपाल या पदावर पदोन्नती दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सन २०१९ मध्ये कनिष्ठ लेखा परिक्षक / रोखपाल गट क या पदावर पदोन्नती देताना महानगरपालिका सेवाभरती नियम २०२१ मंजूर झालेले नव्हते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन सन २०१३ मध्ये "प्रशासकीय संवर्ग आणि सेवा" मिळावा याकरीता विकल्प दिला असतानाही प्रशासनाने प्रशासकीय कामांकरीता पदोन्नती देऊन त्यांची लेखापरिक्षण व लेखा विभागात पदस्थापना करण्यात आल्यामुळे पुढील पदोन्नतीच्या संधीपासून कर्मचारी वंचित राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाने दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत विचाराधीन क्षेत्रातील अधिकारी /कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय /न्यायालयीन प्रकरणांची शहानिशा /पडताळणी करुन पदोन्नती समितीच्या बैठकीत सेवाज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी बाबींचा सर्वकष विचार करुन विभागीय पदोन्नती समितीच्या सर्वानुमते झालेल्या निर्णयानुसार वर्ग -१ व वर्ग ४ या संवर्गातील अधिकारी /कर्मचारी यांची निवड सूची प्रसिध्द करण्यात आली असून त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या नावासमोर "अपात्र (बी कॉम पदवी नाही)" असा शेरा नमुद करुन त्यांची पदोन्नती डावलण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कर्मचाऱ्यांनी याबाबत दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी मा.आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने चौकशी करुन सदर कर्मचाऱ्यांना अपात्र ठरविण्यापूर्वी धोरणात्मक निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांवर झालेला अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.

कनिष्ठ लेखा परिक्षक/रोखपाल गट क या पदावर सेवाभरती नियम, २०१० मधील नमुद अर्हतेनुसार निम्न संवर्गातून सेवाज्येष्ठता, आरक्षण व रिक्त पदांनुसार पदोन्नती देण्यात आलेली आहे.
(३) होय हे खरे आहे.

लेखा व लेखापरीक्षण विभागात रोखपाल / उप लेखापाल / कनिष्ठ लेखा परीक्षक पदस्थापनेचे आदेश दिलेल्या कर्मचाऱ्यांपैकी पदवी अर्हता प्राप्त नसलेले कर्मचारी वगळून सेवा भरती नियम, २०१० नुसार पुढील पदांच्या पदोन्नतीची संधी उपलब्ध होती.
तथापि, दिनांक ७-६-२०२१ पासून सुधारित सेवा भरती नियम लागू झाले आहेत. सदर सेवा भरती नियमामध्ये वरिष्ठ लेखा परीक्षक/ लेखापाल या पदावर पदोन्नती देण्यासाठी बीकॉम पदवी अर्हता

आवश्यक आहे. कार्यरत कनिष्ठ लेखापरिक्षक/ वरिष्ठ लिपिक लेखा गट क मधील कर्मचारी हे बी कॉम ही अर्हता पूर्ण करीत नसल्याने त्यांना पुढील वरिष्ठ लेखा परीक्षक/लेखापाल या पदाच्या पदोन्नतीपासून वंचित आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत सर्वानुमते झालेल्या निर्णयानुसार कनिष्ठ लेखापरिक्षक / वरिष्ठ लिपिक लेखा गट क मधील कार्यरत कर्मचारी यांना सेवा भरती नियम, २०२१ मध्ये नमूद बीकॉम ही पदवी अर्हता धारण करीत नसल्याने वरिष्ठ लेखा परीक्षक/लेखापाल या पुढील पदोन्नतीच्या पदावर पदोन्नती अनुज्ञेय करण्यात आलेली नाही.

(५) होय, हे खरे आहे.

महापालिकेतील पदोन्नत न झालेले कर्मचारी व म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्राने सदरहू कर्मचारी यांना वरिष्ठ लेखा परीक्षक/लेखापाल किंवा अधीक्षक गट-क समकक्ष संवर्गात पदोन्नती देणेबाबत विनंती केलेली आहे. वरिष्ठ लेखापरिक्षक / लेखापाल संवर्गाचे सेवाभरती नियम शिथिल करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील तळोजा येथील ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीतील कामगारांना सेवानिवृत्तीचे प्रलंबित ठेवी मिळणेबाबत

**(३) २२५९ (१८-०६-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील तळोजा येथील ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड या कंपनीतील १७५ कामगारांनी २४ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर सेवानिवृत्तीनंतर देय असलेली नऊ कोटी रुपयांची थकीत देणी मिळण्याबाबत येथील कामगारांनी अनेक वेळा मागणी केली असतानाही प्रशासनाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्याने येथील निवृत्त कामगारांनी आंदोलन करण्याचा इशारा दिल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीतील ३२५ कंत्राटी व १७५ कायम कामगार असे एकूण ५०० कामगार न्याय मागत असून, या कंपनीमधून १७५ कायम कामगारांपैकी ७१ कामगारांचा तणावाखाली मृत्यू झाला असून त्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही मदत मिळाली नसल्याने त्यांचे कुटुबिंय उक्त मोबदल्यापासून वंचित असून या निवृत्त कर्मचाऱ्यांना नियमानुसार मंजूर झालेली ८ कोटी ८६ लाख रुपयांची देणी देण्याकरीता मा.उच्च न्यायालयाने सदर कंपनीची अनेक ठिकाणी असलेल्या मालमत्तांचे लिलाव करून कामगारांची देणी तात्काळ देण्यासाठीचे आदेश दिले असतानाही या कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामगारांना न्याय मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (२३-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) ट्रान्सपॉवर इजिनिअरिंग लिमिटेड ही कंपनी तळोजा, एमआयडीसी, ता.पनवेल जि.रायगड येथे १९७६ पासून कार्यरत होती. सदर कंपनी एमएसईबी (MSEB) करीता विजेच्या टॉवर संबंधीचे उत्पादन व इतर अनुषंगिक कामकाज करीत होती. सदर कंपनीच्या आस्थापनेत १७५ कायम कामगार तसेच सुमारे २५० ते ३०० कंत्राटी व इतर रोजंदारीवर कामगार काम करीत होते. उत्पादनाशी निगडीत व आर्थिक समस्यांमुळे ट्रान्सपॉवर इजिनिअरिंग कंपनी लिमिटेड तळोजा या आस्थापनेतील कामकाज सन १९९९ पासून बंद पडले आहे.

कंपनी बंद पडल्यामुळे कंपनीच्या देणीदारांपैकी देना बँक व इतर बँकांनी कर्ज वसूली न्यायाधिकरण, मुंबई (DRT) येथे कंपनीविरुध्द वसुली अर्ज दाखल केला होता.सदर न्यायाधिकरणाच्या आदेशान्वये या कंपनीच्या मालमत्तेचा लिलाव करण्यात आला व ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड या कंपनीची तळोजा एमआयडीसी ही मालमत्ता लिलावात मे.स्टील लाईट इंजिनिअरींग लि. या कंपनीने दिनांक १८/०१/२००६ रोजी रुपये ३.५१ कोटी इतक्या रकमेस सदर कंपनी विकत घेतली आहे.

तद्नंतर उपलब्ध माहितीनुसार ट्रान्सपॉवर इजिनिअरिंग लिमिटेड कंपनीला मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिवाळखोर ठरवून तेथे अवसायक (लिक्विडेटर) नेमण्यात आले आहेत. अवसायक यांनी कंपनीच्या एमआयडीसी बुटीबोरी इंडस्ट्रीयल एरिया, नागपूर, तळोजा एमआयडीसी, ता.पनवेल, जि.रायगड व लतिफ हाऊस, पहिला मजला, १२९-ए, दादासाहेब फाळके रोड, दादर (पू), मुंबई या मालमत्तांपैकी तळोजा एमआयडीसी, ता.पनवेल, जि.रायगड ही मालमत्ता रुपये ५.५० कोटी इतक्या रक्कमेस तर एमआयडीसी बुटीबोरी इंडस्ट्रीयल एरिया, नागपूर या मालमत्तेची रुपये ८.५० कोटी इतक्या रकमेस लिलावाद्वारे विक्री केली आहे. मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे एमआयडीसी बुटीबोरी इंडस्ट्रीयल एरिया, नागपूर येथील मालमत्तेच्या विक्रीस मा.उच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली आहे. कंपनीच्या मालमत्तेच्या विक्रीतून उपलब्ध झालेल्या रक्कमेमधून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे लिक्वीडेटरकडून कामगारांना त्यांच्या कायदेशीर देण्यांबाबत दाखल झालेल्या दाव्यानुसार निश्चित केलेल्या रुपये ९,२४,३९,३३५/- इतक्या रक्कमेपैकी तळोजा येथील १७५ कामगारांना ७६ % रक्कम म्हणजेच रुपये ७,०२,५३,९९५/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे व उर्वरीत २४% रक्कम १७५ कामगारांना वितरीत करणे बाकी असल्याचे अवसायकाने दिलेल्या लेखी पत्रावरून दिसून येत आहे.

ट्रान्सपॉवर कामगार संघटना यांनी मागणी केल्याप्रमाणे एमआयडीसी बुटीबोरी इंडस्ट्रीयल एरिया, नागपूर येथील जागेचा लिलाव लवकरात लवकर करुन कामगारांची थकीत रक्कम लवकर मिळावी, अशी त्यांची मागणी असून त्याबाबत वेळोवेळी त्यांनी लिक्विडेटर यांना विनंती केली आहे. याचबरोबर ट्रान्सपॉवर कामगार संघटनेचे असेही म्हणणे आहे की, कर्ज वसूली न्यायाधिकरण (DRT) यांनी दिनांक १८/०१/२००६ रोजी लिलावाद्वारे ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड या कंपनीची तळोजा एमआयडीसी, पनवेल येथील मालमत्ता रुपये ३.५१ कोटी इतक्या रक्कमेस स्टील लाईट इंजिनिअरिंग लिमिटेड यांना विकली आहे. मात्र सदरची रक्कम बाजार मुल्यापेक्षा खूपच कमी असून या मालमत्तेचे अंदाजे बाजारमूल्य ३० कोटी रुपये एवढे आहे. करीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांनी या मालमत्तेचे हस्तांतरण स्टील लाईट इंजिनिअरिंग लि. यांना करण्यापूर्वी कामगारांची थकीत देणी व त्यावरील एवढ्या वर्षाचे व्याज अंदाजे रुपये १५ कोटी कामगारांना विभागून द्यावे, अशी संघटनेची मागणी आहे. यास्तव, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) ने ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड या कंपनीच्या

तळोजा एमआयडीसी, पनवेल या मालमत्तेचे हस्तांतरण करताना कामगारांचे हक्क प्राप्त होतील, अशा दृष्टीने कार्यवाही करावी, अशी लेखी विनंती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांना करण्यात आलेली आहे.
वरील सर्व वस्तुस्थिती पाहता कंपनीची एमआयडीसी बुटीबोरी इंडस्ट्रीयल एरिया, नागपूर येथील मालमत्ता विक्री करणे, ही बाब पूर्णत: लिक्विडेटर यांच्या अखत्यारीत असल्याचे स्पष्ट होते. सदर मालमत्ता लिक्विडेटर यांच्या ताब्यात असून त्यांची लवकरात लवकर विक्री होणे आवश्यक आहे. विक्रीच्या निधीतून कामगारांची उर्वरीत २४ % देणी देणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) २४१४ (१७-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे, श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक २४९ ला दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षकांची ७५ टक्के पदे रिक्त असून, मंजूर २०० पदांपैकी केवळ ४८ अधिकारी कार्यरत असल्यामुळे औषधांच्या गुणवत्तेची तपासणी, औषध नियमन आणि औषध विक्रीवरील देखरेख, औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे परवाने तपासणे यांसारखी महत्त्वाची कामे प्रभावित होत असून, बनावट औषधांचे तपासणी अहवाल येण्यास विलंब लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औषधी द्रव्ये आणि सौंदर्य प्रसाधन अधिनियम १९४०, औषधी द्रव्ये आणि सौंदर्य प्रसाधन नियम १९४५ नुसार सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि औषधांची गुणवत्ता सुनिश्चित करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनावर सोपविण्यात आली असून, औषध निरीक्षकांची १५२ रिक्त पदे भरण्याचे मागणीपत्र विभागाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी सादर केले असून गत तीन वर्षापासून रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासनांतर्गत विविध संवर्गासाठी ४१७ मंजूर पदांपैकी औषध निरीक्षकांच्या पदांसह विश्लेषणात्मक रसायनशास्त्रज्ञांची १३ पदे, वरिष्ठ तांत्रिक सहाय्यकांची २९ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागतील औषध निरीक्षकांची तसेच अन्य रिक्त पदे भरण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच फार्मसी ही शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांच्या भवितव्याच्या दृष्टीने सदर रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (२६-०९-२०२५) :** (१), (२), (३) व (४) अन्न व औषध प्रशासनात विविध संवर्गात एकूण १२७१ पदे मंजूर आहेत. त्यामध्ये औषध निरीक्षक संवर्गात एकूण २०० पदे मंजूर आहेत.

सद्य:स्थितीत औषध निरीक्षकांची एकूण ४४ पदे कार्यरत असून १५६ पदे रिक्त आहेत. विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ संवर्गात एकूण ४० पदे मंजूर असून त्यापैकी २० पदे रिक्त आहेत. तसेच, वरिष्ठ तांत्रिक सहायक संवर्गात एकूण ४५ पदे मंजूर असून त्यापैकी ४१ पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक १७/११/२०२१ रोजी ८७ औषध निरीक्षकांची पदभरती करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. तथापि, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ११/१२/२०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये सदर जाहिरात व भरतीबाबतची पुढील कार्यवाही स्थगित करण्यात आली होती. तद्नंतर, शासन पत्र दिनांक १२/०२/२०२५ अन्वये औषध निरीक्षक,गट-ब संवर्गाच्या एकूण १०९ पदांच्या पदभरती करण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून, त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षकांच्या एकूण १०९ पदांच्या पदभरतीबाबत दिनांक २९/०७/२०२५ रोजी जाहिरात क्र.११६/२०२५ प्रसिध्द केली आहे. याबाबत, पुढील कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येत आहे.

वरिष्ठ तांत्रिक सहायक, गट-क संवर्गातील एकूण ३७ रिक्त पदांच्या पदभरतीसाठी दिनांक ३०/१२/२०२४ व विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ,गट-क संवर्गातील एकूण १९ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ३१/१२/२०२४ रोजी मे.टिसीएस संस्थेमार्फत परीक्षा घेण्यात आल्या आहेत. सदर भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आरापुर (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे औद्योगिक क्षेत्र उभारण्यासाठी मान्यता देण्याबाबत

**(५) २४३५ (१९-०६-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चिकलठाणा, शेंद्रा व वाळूज औद्योगिक वसाहतीत नवीन उद्योगासाठी भूखंड शिल्लक नसल्याने गंगापूर तालुक्यातील आरापुर, सुलतानाबाद व गवळी शिवरा येथे औद्योगिक क्षेत्र उभारण्यासाठी या परिसरातील खाजगी व शासकीय अशी ९५८ हेक्टर जमीन संपादनाचा प्रस्ताव दिनांक २ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास उद्योग विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावात उच्चाधिकार समितीने सुधारणा करुन माहे जुलै, २०२२ मध्ये ७६२.०३ हेक्टर इतके क्षेत्र ग्रहीत धरुन औद्योगिक क्षेत्र म्हणून मान्यता दिली असल्यास येथे मध्यम व लघु उद्योजकांना मोठी संधी निर्माण होऊन बेरोजगारांना रोजगार मिळण्याची संधी प्राप्त होणार असल्याने उद्योग विभागाकडे प्रलंबित असलेल्या सदर प्रस्तावास तातडीने मान्यता देवून अधिसूचना निर्गमित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०४-०७-२०२५) :** (१) उच्चाधिकार समितीच्या दिनांक २४/०१/२०२० रोजीच्या १२१ व्या बैठकीतील मान्यतेनंतर ७५३.३० हे.आर क्षेत्राचा प्रस्ताव शासनास दिनांक १४/३/२०२० रोजी तसेच ७५२.४३ हे.आर खाजगी व ९.६० हे.आर सरकारी असे एकूण ७६२.०३ हे.आर क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतूदी लागू करण्यासाठी सुधारित प्रस्ताव

शासनास दिनांक ४/८/२०२१ रोजी सादर करण्यात आला होता.

तथापि, सदर प्रस्तावामध्ये नमूद क्षेत्रात गावनिहाय झालेला बदल व प्रस्तावामध्ये नव्याने ९.६० हे.आर. सरकारी क्षेत्र समाविष्ठ करण्यात आले. त्यामुळे सुधारित प्रस्ताव दिनांक १४/०७/२०२२ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या १४३ व्या बैठकीत सादर करण्यात आला. त्यास उच्चाधिकार समितीने मंजूरी प्रदान केली. दरम्यान दिनांक २५/०८/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये दिनांक ०१/०६/२०२२ नंतर उच्चाधिकार समितीचे बैठकीमध्ये झालेल्या निर्णयावर पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये असे निर्देश देण्यात आले होते.

तदनंतर अति.वाळुंज औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे आरापूर,गवळी शिवरा व मौजे सुलतानाबाद येथील प्रस्तावित क्षेत्राची औद्योगिक व आर्थिक सुसाध्यता तपासणीसाठी सहमुख्य कार्यकारी अधिकारी, मऔवि महामंडळ यांच्या समितीकडून दिनांक २०/०२/२०२५ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली. त्यानुसार ७५२.४३ हे.आर खाजगी व ९.६० हे.आर सरकारी असे एकूण ७६२.०३ हे.आर क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतूदी लागू करण्याबाबतचा प्रस्तााव शासनास दिनांक ६ / ३/ २०२५ रोजी सादर करण्यात आला.

त्यानुषंगाने प्रस्तावित ७६२.०३ हे.आर क्षेत्रास प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) लागू करण्याबाबतची अधिसुचना दिनांक २/०६/२०२५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) राजपत्रात प्रसिध्द् करण्यात आलेल्या सदर अधिसुचनेनुसार एकूण ७६२.०३ हे.आर क्षेत्राच्या भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर, उपविभागीय अधिकारी, वैजापूर तसेच प्रादेशिक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक १२/६/२०२५ रोजी कळविण्यात आले आहे.

त्याानुसार भूसंपादनाची पुढील कार्यवाही उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांचेमार्फत सुरु असून प्रकरण संयुक्त मोजणीच्या टप्प्यावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील वैद्यकीय अधीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) २६७९ (१०-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण खात्याच्या अखत्यारित असलेल्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधीक्षक पदावरील नियुक्ती ही राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या निकषानुसार (एनएमसी) प्राध्यापकाची दर्जाची असावी असा आदेश असतानासुध्दा या पदाची जबाबदारी सहयोगी प्राध्यापक व त्याच्या खालील वर्गाच्या अधिकाऱ्याकडे दिली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्वच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये १४ वर्षांपासून स्थायी वैद्यकीय अधीक्षकांचे पद भरले गेली नसल्यामुळे येथे कार्यरत निम्न श्रेणीच्या अधिकाऱ्यांकडे कार्यभार असल्याने वैद्यकीय शिक्षकांवर कामाचा ताण वाढत असल्याने वैद्यकीय अधीक्षकाची रिक्त पदे कायस्वरुपी

भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०७-१०-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे. सद्य:स्थितीत वैद्यकीय अधीक्षक या पदाचे सेवाप्रवेश नियम अस्तित्वात नाही. सदर पदाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
सेवाप्रवेश नियम अधिसूचित झाल्यानंतर वैद्यकीय अधीक्षकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. राष्ट्रीय वैद्यक परिषदेच्या निकषाची पूर्तता करणारे ज्येष्ठतेनुसार इच्छुक प्राध्यापक तसेच प्राध्यापक इच्छुक नसल्यास, ज्येष्ठतेनुसार इच्छुक सहयोगी प्राध्यापक यांना वैद्यकीय अधीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवून सदर पदे भरण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सागरी किनारपट्टीवरील ७ जिल्ह्यात 'कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन' तयार करण्याबाबत

**(७) ३११७ (१७-०७-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यात 'कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन' शिवाय एकाही बांधकामाला परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने संबंधित प्राधिकरणांना दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी वा तत्पूर्वी दिले आहेत, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, उक्त आदेशामुळे राज्यातील ७ जिल्ह्यातील किनारपट्टीवरील अनेक विकासकामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि राज्यातील सागरी किनारपट्टीवरील ७ जिल्ह्यात 'कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन' तातडीने तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही,
तथापि, राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे दाखल प्रकरण (O.A.No.१७५/२०२४) मधील दिनांक ०४/०२/२०२५ रोजीच्या आदेशानूसार, ता.उरण, जि.रायगड सिआरझेड नकाशा क्र. MH-७३ क्षेत्रातील CRZ नकाशे (१: ४००० प्रमाणात) तयार होईपर्यंत प्रकल्पांना CRZ अनुमती देण्याविषयी स्थगिती आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील सागरी किनारपट्टीवरील ७ जिल्ह्यांचे कोस्टल झोन मॅनजमेंट प्लॅन (१: २५००० प्रमाणात) तयार झाले असून त्यांना केंद्र शासनाने दिनांक २९/०९/२०२१ व दिनांक २५/०८/२०२३ रोजी मंजूरी दिलेली आहे. दुसऱ्या टप्प्यात, सदर मंजूर (१: २५०००) प्रमाणातील नकाशांच्या आधारावर सिआरझेड नकाशे (१: ४०००) प्रमाणात तयार करण्याचे काम केंद्र शासन प्राधिकृत National Centre Sustainable Costal management, Chennai या संस्थेला दिनांक १७/०८/२०२३ नुसार प्रदान

करण्यात आले असून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे प्रलंबित कमिशन मिळण्याबाबत

**(८) ३४५२ (१७-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात एकूण ८९० स्वस्त धान्य दुकानदार असून स्वस्त धान्य दुकानदारांच्या माध्यमातून ६६,५१७ अंत्योदय कार्ड धारक व १,८६,०८९ प्राधान्य कुटुंब लाभार्थी यांना अन्नधान्य वितरण करण्याचे काम होत असून, सदर स्वस्त धान्य दुकानदारांना माहे डिसेंबर,२०२४ ते माहे एप्रिल, २०२५ या चार महिन्यांचा मोबदला (कमिशन) मिळाला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरुवातीला सर्व कमिशन जिल्हा स्तरावर म्हणजे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयातून दुकानदारांना पाठविले जात होते, परंतु डिसेंबरपासून मुंबई येथून कमिशन वितरण व्यवस्था करण्यात आल्याने दुकानदारांना कमिशनसाठी वारंवार मागणी करावी लागत असून त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुकानदाराना ४ महिने एवढा कालावधी होऊनही अद्याप त्यांचे कमिशन न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच त्यांना तात्काळ चार महिन्यांचे कमिशन मिळावे यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२९-०९-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

भंडारा जिल्ह्यातील एकूण ८९० रास्त भाव दुकानदार यांना माहे मे, २०२५ पर्यंतचे कमिशन माहे जुलै, २०२५ मध्ये अदा करण्यात आले आहे.

जानेवारी, २०२५ पुर्वी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना PFMS प्रणालीअंतर्गत SNA मार्फत कार्यान्वित होत होती. वित्त विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्देशानुसार सदर योजना आता जानेवारी, २०२५ पासून SNA-SPARSH प्रणालीमार्फत कार्यान्वित झालेली आहे. सबब, आता सर्व अधिनस्त कार्यालयांकडुन SNA-SPARSH प्रणालीवर देयके तयार करुन SNAP प्रणालीमार्फत वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाच्या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे मंजूरीसाठी सादर केले जातात. वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून याबाबत तपासणी झाल्यानंतर सर्व देयके सायबर ट्रेझरीकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केले जातात.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर पालखी मार्गाची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत

**(९) ३५१२ (१७-०७-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारकऱ्यांची पंढरपूर यात्रा सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रमुख पायाभूत सुविधांतर्गत पालखी मार्गाचे काम पूर्णत्वाकडे आले असून, या मार्गावरची अपूर्ण कामे पालखी सोहळ्यापुर्वी पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाखरी ते पंढरपूर या प्रमुख पालखी मार्गाचे काम गत तीन वर्षांपासून सुरु असून पालखी सोहळा जवळ येऊनही संबंधित मार्गावर व बाह्यवळण मार्गावर ओढ्यावरील पुलासाठी ठिकठिकाणी रस्ता खोदून ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालखी सोहळ्यापुर्वी संबंधित मार्गावरील वाहतूक योग्य होण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (३०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे. आळंदी -पुणे-सासवड-माळशिरस-पंढरपूर -मोहोळ हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे.
(२) व (३) सदरील कामाचा कार्यारंभ आदेश (Appointed Date) दिनांक ०१/११/२०२३ रोजी दिलेला आहे व काम पूर्ण करणेचा कालावधी २ वर्ष आहे म्हणजेच सदरचे काम प्रगतीपथावर आहे. काम करतेवेळी Diversions / वळण देणे क्रमप्राप्त आहे, परंतु आषाढी वारी २०२५ चे दृष्टीकोनातून सदर रस्त्यावरुन वारकरी आणि भाविकांचा प्रवास होत असल्याने रस्त्याच्या बाजूची झाडे झुडपे काढणे, साईटपट्टी मुरूमाने भरुन घेणे व इतर संकीर्ण बाबींची कामे करून रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. जिल्हा प्रशासन, पोलीस व पालखी विश्वस्तांचे सल्ल्यानुसार /निर्देशानुसार २०२५ आषाढी वारीचे दृष्टीकोनातुन सर्व अनुषंगीक कामे वारी पूर्वीच पूर्ण केलेने आषाढी वारी सुखरुप पार पडली आहे. उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे नियोजन केले जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यात अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अनेक गरजू पात्र लाभार्थी रेशनकार्ड पासून वंचित असल्याबाबत

**(१०) ३५३५ (१७-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात सुमारे दीड लाख नागरिकांची रेशनकार्डची मागणी असताना शासनाकडून केवळ ३९,३३१ लाभार्थी वाढविण्यास मंजुरी देण्यात आली असल्यामुळे पात्र असलेल्या लाखांहून अधिक लाभार्थ्यांना अद्यापी धान्याची प्रतिक्षा करावी लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मोहिम ही अन्नसुरक्षा योजना सन २०११ ची लोकसंख्या गृहीत धरुन राबविली जात असल्यामुळे अनेक गोरगरीब पात्र लाभार्थी सदर लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सातारा जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातील नागरिकही रेशन कार्ड धारण करण्यास पात्र असूनही सदर योजनेचा लाभ न मिळालेल्या गरजू पात्र लाभार्थ्यांना तातडीने लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (३०-०९-२०२५) :** (१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सन २०११ ची लोकसंख्या गृहीत धरुन, केंद्र शासनाने मंजूर केलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत शासनस्तरावरुन जिल्हानिहाय इष्टांक पुर्नवाटप करण्यात येते. त्यानुसार दिनांक ०१/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये सातारा जिल्ह्यासाठी अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांसाठी (AAY) २७,०३० शिधापत्रिका इतका इष्टांक व प्राधान्य कुटुंब योजनेतील (PHH) लाभार्थ्यांसाठी १६,९६,२५९ लाभार्थी इतका इष्टांक मंजूर करण्यात आला आहे.

(२) व (३) गरजू पात्र लाभार्थ्यांना तातडीने लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाच्या दिनांक ०४/०४/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम राबवून अपात्र, दुबार, मयत, स्थलांतरीत लाभार्थ्यांची नावे कमी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त तपशिलानुसार राज्य शासनाच्या दिनांक २५/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक ३०/०९/२०२५ अखेरपर्यंत लाभार्थ्यांचे योग्य लक्षीकरण (Rightful Targeting) करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नांदेड, लातूर, धाराशीव, यवतमाळ व बारामती ही पाच विमानतळे हस्तांतरीत करुन विमानसेवा सुरु करण्याबाबत

**(११) ३६२५ (१७-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नांदेड, लातूर, धाराशिव, यवतमाळ व बारामती ही पाच विमानतळे विकसित करुन त्याचा वापर करण्यासाठी रिलायन्स उद्योग समूहासोबत १५ वर्षांपूर्वी केलेले करार रद्द करुन सदरची पाचही विमानतळे पुन्हा एमआयडीसीकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर नांदेडच्या श्री गुरुगोविंद सिंगजी विमानतळ येथून मुंबई आणि दिल्लीसाठी विमानसेवा त्वरित सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत (०६-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि. यांना महामंडळाने नांदेड, लातूर, धाराशिव, यवतमाळ व बारामती ही विमानतळ हस्तांतरीत करताना केलेल्या करारनाम्याच्या अटी व शर्तीच्या उल्लंघनाबाबत त्यांना ७ दिवसाची कारणे दाखवा तथा करारनामा रद्द करण्याची नोटीस बजावण्यात आली; सदर नोटिशीस अनुसरून मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि. यांनी त्यांच्या दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या ई-मेल नुसार महामंडळास त्यांचा खुलासा सादर केला होता.

परंतु, मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा. लि. यांच्याकडून करारनाम्यातील अटी व शर्तींचे झालेले उल्लंघन पाहताः प्रादेशिक अधिकारी व संबंधित विशेष नियोजन प्राधिकरणांनी मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स लि. यांना हस्तांतरीत केलेले विमानतळ दिनांक ०८/०४/२०२५ रोजी योग्य प्रक्रियेचा अवलंब करून कायदेशीर चौकटीतं 'पुनर्स्थापना नोटीस' (Resumption Notice) देऊन विमानतळावर उपलब्ध असलेल्या मालमत्तेचा 'पंचनामा करून ताब्यात घेतले होते.

सद्य:स्थितीत ५ विमानतळापैकी ४ विमानतळे (नांदेड, लातूर, धाराशिव व बारामती)(नांदेड विमानतळ दिनांक २३/०६/२०२५ रोजी, बारामती विमातळ दिनांक १९/०८/२०२५ रोजी, धाराशिव विमातळ दिनांक २०/०८/२०२५ रोजी व लातूर विमानतळ दिनांक २१/०८/२०२५ रोजी) मे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. (MADC) यांना करारनामा करून हस्तांतरीत करण्यात आले असून यवतमाळ विमानतळ हस्तांतरणाच्या अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या नव्या गृहनिर्माण धोरणाला शासनाने मान्यता दिल्याबाबत

**(१२) ३८८४ (१८-०७-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या नव्या गृहनिर्माण धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने दिनांक २० मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली असून गृहनिर्माण धोरणामध्ये प्रामुख्याने कोण-कोणत्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे,

(२)असल्यास, गृहनिर्माण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०८-२०२५) :** (१) व (२) या विभागाच्या माझे घर, माझा अधिकार हे ब्रीद अनुसरुन राज्यातील प्रत्येक नागरिकाला परवडणारी, सर्वसमावेक्षक, शाश्वत आणि पुननिर्माणशील या मूलभूत तत्वांचे आधारित घरे उपलब्ध करुन देण्याचे अभिवचन देणारे "राज्य गृहनिर्माण धोरण - २०२५" ला दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या मा.मंत्रिमंडळच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय क्र. गृनिधो २०२५/प्र.क्र.९१/गृनिधो-१, दिनांक २३/०७/२०२५ अन्वये सदर धोरणाची प्रत संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

सदर राज्य गृहनिर्माण धोरणामध्ये डाटा आधारित निर्णय प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता व पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर देण्यात आला आहे. सदर राज्य गृहनिर्माण धोरणामध्ये " प्रामुख्याने - गृहनिर्माण धोरणाची ४ मूलतत्वे, राज्यात २०३० पर्यंत ३५ लाख घरांचे उद्दिष्टे, राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल (स्टेट हाऊसिंग इन्फार्मेशन पोर्टल)(SHIP), निवासी वापरासाठी योग्य असलेल्या शासकीय जमिनींची भूमी अधिकोष (Land Bank) आधारसामग्रीची निर्मिती, राज्यस्तरीय सर्वोच्च तक्रार निवारण समिती (AGRC), महाआवास निधी, झोपडपट्ट्यांसाठी Cluster पुनर्विकासाला प्रोत्साहन, झोपडपट्टी पुनर्वसनासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (CSR)

वापर, धोकादायक इमारतींचा पुनर्विकास इत्यादी बाबींचा समावेश आहे. या धोरणातील समाविष्ट बाबींच्या अंमलबजावणीकरीता स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुलींच्या सक्षमीकरणाकरीता लेक लाडकी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(१३) ३९४८ (१७-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील मुलींच्या शिक्षण, आरोग्य व सर्वांगीण विकासासाठी लेक लाडकी योजना सुरु करण्यात आली असून, मुंबई महानगरात सदर योजनेतर्गत केवळ १०० लाभार्थी असल्याची व योजनेचा लाभ शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील गरीब मुलींना मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लेक लाडकी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२२-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

राज्यात लेक लाडकी योजनेंतर्गत आजपर्यंत १,६८,१५१ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून मुंबई शहर व मुंबई उपनगर अंतर्गत १५२५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.
(२) लेक लाडकी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता विविध स्तरावरुन योजनेची प्रचार प्रसिध्दी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य महिला आयोगाच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याबाबात

**(१४) ४५१८ (१०-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य महिला आयोगाकडे मागील वर्षभरात प्राप्त झालेल्या किमान १३ हजार ७३८ विविध प्रकरणांमध्ये हुंडाबळीची एकही तक्रार नसून सर्वाधिक तक्रारी वैवाहिक समस्यांसंदर्भात असल्याने हुंडाबळीच्या तक्रारींची नोंद करण्याबाबत शासनाची भूमिका उदासीन असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात महिलांच्या हिंसाचार, शोषण, छेड, अत्याचारांशी संबंधित घटना महिला आयोगाच्या निदर्शनास येताच संबंधित शासकीय तसेच पोलीस यंत्रणाकडून दोषींवर योग्य व आवश्यक ती कारवाई करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुण्यातील वैष्णवी हगवणे हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी राज्य महिला आयोग व

संबंधित शाासकीय व पोलीस यंत्रणा यांनी अद्याप कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्याबाबत व राज्य महिला आयोगाच्या कार्यपध्दतीत सुधारण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१०-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही,

राज्य महिला आयोगाकडे हुंड्याच्या मागणीबाबत तक्रारी प्राप्त होतात. परंतु, सदर तक्रारी या वैवाहिक समस्यांच्या स्वरुपाच्या असल्याने सदर तक्रारी सामाजिक समस्या या प्रकरणात नोंदविण्यात येतात.

(२) महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा १९९३ कलम १२ नुसार तपास करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यांच्या व तपास अभिकरणांच्या सेवा वापरण्याचा आयोगाला अधिकार आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन सदर तक्रारी पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालये व पोलीस यंत्रणेकडे पाठविण्यात येतात.

(३) हे खरे नाही,

श्रीम. वैष्णवी हगवणे यांच्या दिनांक १६/०५/२०२५ रोजी झालेल्या दुर्देवी मृत्यूबाबत प्रसारमाध्यमांतून प्रसारित झालेल्या बातमीची आयोगाने स्वतःहून दखल घेऊन या प्रकरणी बावधन पोलीस ठाणे, जि.पुणे यांच्याकडे दिनांक १९/०५/२०२५ रोजी पत्र पाठवून चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविले. त्यानुसार चौकशी अहवाल दिनांक २६/०५/२०२५ रोजी आयोग कार्यालयास प्राप्त झाला. सदर अहवालानुसार बावधन पोलीस ठाण्यामध्ये FIR No. २०६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ८०(२), १०८,११५(२), ३५२, ३५१(२), ११८(१), ३(५), ६१(२) जे.जे. ॲक्ट, २०१५ कलम ७५ व ८७, हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१ च्या कलम ४ प्रमाणे (भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३४,१२० (ब), ३०४(ब),३०६,३२३,३२४,५०४,५०६) नुसार गुन्हा दाखल झाला असून प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) आयोगामार्फत राज्यातील विविध ठिकाणी महिलांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमाद्वारे प्रत्यक्ष जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन महिलांकरीता जनसुनावण्या घेण्यात येतात. तसेच, पोक्सो कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. महिला कारागृह भेटी, आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या महिलांच्या सुरक्षितता व स्वच्छतेच्या अनुषंगाने आरोग्यवारी हा उपक्रम राबविण्यात येतो. सायबर सुरक्षेच्या अनुषंगाने मिशन ई सुरक्षा या विषयावर कार्यक्रम घेण्यात येतात, मानवी तस्करी रोखण्यासाठी कार्यशाळा, कौटुंबिक हिंसाचार अधिनियम, २००५ या कायद्याबाबत जनजागृती व इतर विविध विषयांवर महिला आयोगामार्फत राज्याच्या विविध भागात कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.

हेल्पलाईनः- पीडित महिलेच्या अर्जावर तात्काळ कार्यवाही होण्यासाठी आयोगाची १५५२०९ या क्रमांकाची हेल्पलाईन कार्यालयीन वेळेत सुरू आहे.

Grievance Portal:- आयोग कार्यालयात येणाऱ्या तक्रारींचा वाढता व्याप लक्षात घेता तसेच कालानुरूप महिलांच्या विविध प्रकारच्या समस्यांची व्याप्ती पाहता, पीडित महिलेला तिच्या तक्रार अर्जाबाबत तात्काळ माहिती मिळण्याकरीता आयोगामार्फत संगणकीय प्रणाली (Grievance Portal) सुरू करण्याची

कार्यवाही महाआयटीच्या सहकार्याने सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील डोंगरी येथील खाजगी रुग्णालयाने रुग्णाची फसवणूक केल्याबाबत

**(१५) ५२०९ (१२-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील डोंगरी येथील एका खाजगी रुग्णालयाने नागपाडा येथील ७४ वर्षीय व्यक्ती कोरोनाबाधित नसतानाही सदर खाजगी रुग्णालयाने रुग्णाला रुपये ४८ हजारांचे रेमडेसिवीर आणि अन्य औषधे दिले असून बिलामध्येही कोरोना आणि बिगर कोरोना असे दोन्ही प्रकारचे अतिदक्षता विभागाचे मिळून रुपये ५० हजारांपेक्षा अधिकचे बिल आकारण्यात आले आहे, सदर खाजगी रुग्णालयाने रुग्णाला कोरोनाची बाधा झालेली नसतानाही उपचार करुन फसवणूक केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी रुग्णाच्या नातेवाईकांनी डोंगरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णाची फसवणूक करणाऱ्या खाजगी रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०२१) :** (१) व (२) याबाबत रुग्णाच्या मुलाने त्यांच्या वडीलांचे कॉज ऑफ डेथ चुकीचे दिले व बिल जास्त आकारले म्हणून हबीब रुग्णालयाविरुध्द डोंगरी पोलीस ठाणे येथे दिनांक १४/०९/२०२० रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता.
(३) याबाबत रुग्णाच्या मुलाने त्यांच्या वडीलांचे कॉज ऑफ डेथ चुकीचे दिले व बिल जास्त आकारले म्हणून हबीब रुग्णालयाविरुध्द डोंगरी पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या तक्रार अर्जास अनुसरुन तक्रारदार यांचे जबाब नोंद केले असता, तक्रारदार त्यांच्या वडीलांचे कोरोना रिपोर्ट परत संबंधित लॅबकडून मागवून घेणार आहेत व रिपोर्ट आल्यानंतर ते त्यांच्या वडीलांचे कॉज ऑफ डेथ बदलून घेणार आहेत. जर त्यांना याबाबत तक्रार दाखल करावयाची असल्यास ते संबंधित वैद्यकीय विभागाशी पत्रव्यवहार करणार असल्याबाबत त्यांनी जबाबात नमूद केले आहे. पोलीस ठाणेस दिलेला सदरचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. तद्नंतर अद्यापपर्यंत तक्रारदार यांनी सदर हबीब रुग्णालयासंदर्भात डोंगरी पोलीस ठाणे येथे कोणतीही तक्रार सादर केलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद व दंत चिकित्सा महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) १०३४५ (०६-०१-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.किशोर दराडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद व दंत चिकित्सा महाविद्यालयात अधिष्ठाता, शिक्षक, प्राध्यापक व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त पदांपैकी माहे ऑक्टोबर, २०२१ पर्यंत एकूण किती पदे मंजूर करण्यात आली व त्यापैकी किती पदे अद्याप रिक्त आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२५-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय महाविद्यालय व रुग्णालयांतील वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गाची पदस्थिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | गट-अ | २१८९ | १३७९ | ८१० |
| २ | गट-ब | ३०५१ | १३७७ | १६७४ |
| ३ | गट-क | २७३९८ | १६७५५ | १०६४३ |
| ४ | गट-ड | ९५४३ | ५५६९ | ३९७४ |
|  | एकूण | ४२१८१ | २५०८० | १७१०१ |

संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय दंत महाविद्यालय व वैद्यकीय रुग्णालयामधील दंत विभागातील वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गाची पदस्थिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | गट-अ | १४३ | ९१ | ५२ |
| २ | गट-ब | १८५ | ६७ | ११८ |
|  | एकूण | ३२८ | १५८ | १७० |

(३) वर्ग-१ व २ संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची प्रक्रिया शासनस्तरावर सुरु आहे.
वर्ग-३ तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गाची सरळसेवेची पदे राज्यस्तरीय स्तरावर, संचालनालयामार्फत TCS च्या माध्यमातून स्पर्धापरीक्षेद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील पदे भरण्यात येत आहेत.
(४) पदभरतीची प्रक्रिया सुरु असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

## नागपूर जिल्ह्यातील खाजगी व्यक्तींच्या जागेवर असलेल्या शाळांची जागा जिल्हा परिषदेच्या नावे करण्याबाबत

**(१७) ११०६८ (०६-०१-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील १९६ जिल्हा परिषदेच्या शाळांच्या जागांचे मालकीहक्क हे खाजगी व्यक्तींकडे असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १५७ शाळा ह्या आजही वन विभागाच्या जागांवर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने खाजगी व्यक्तींच्या जागेवर असलेल्या शाळांची जागा ही जिल्हा परिषदेच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०१-१०-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) ज्या जिल्हा परिषदेच्या शाळांकडे जागांबाबत उपलब्ध दस्ताऐवजानुसार ७/१२ उतारा व गांव नमुना ८ अ हे खाजगी मालकांच्या नावे आहेत अश्या सर्व शाळांनी संबंधित मालकाकडून शाळेच्या नावावर दानपत्र तयार करुन घेण्याची कार्यवाही करावी. दानपत्र तयार झाल्यास सदर दानपत्रानुसार संबंधित तहसिल कार्यालयाकडून फेरफार करुन घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तहसिल कार्यालयाकडे सादर करावे असे निर्देश संबंधित सर्व शाळांना गटशिक्षणाधिकारी मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालाड (मुंबई) मधील पी विभागाचे विभाजन करण्याबाबत

**(१८) १७८४८ (२५-०३-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड (मुंबई) येथील जास्त लोकसंख्या असलेल्या विभाग-पी विभागाचे विभाजन जागेअभावी रखडल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालाड (पूर्व) येथे पठाणवाडी परिसरात महानगरपालिकेच्या चौकी करीता आरक्षित असलेली जागा महानगरपालिका कार्यालयकरिता घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पी/उत्तर विभाग मुंबईतील सर्वात मोठा लोकसंख्येचा विभाग असून विभाजनाचा मुद्दा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मालाड (मुंबई) मधील पी विभागाचे विभाजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभागाचे विभाजन करुन, पी/पूर्व कार्यालय मालाड (पूर्व) येथे असलेल्या कुंदनलाल सैगल खुले नाट्यगृहाच्या इमारतीमध्ये प्रस्तावित होते. त्याअनुषंगाने सदर इमारतीच्या किरकोळ दुरुस्त्या, अत्यावश्यक विभागासाठी अत्यावश्यक स्थापत्य कामे, बैठक व्यवस्था व इतर आवश्यक साहित्य, सामग्री पुरविण्याची कामे पूर्ण झाली असून, सदर ठिकाणी पाणीपुरवठा, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, आवक-जावक हे विभाग व नागरी सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे.

पी/पूर्व कार्यालयाचे उद्घाटन दिनांक ०३/१०/२०२३ रोजी करण्यात आले असून, सद्य:स्थितीत कार्यालय सुरळीत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरळी पोलीस वसाहतीतील सुरजमुखी, कृष्णकमळ, रजनीगंधा आणि पारिजात इमारतीतील उदवाहन कार्यान्वित करण्याबाबत

**(१९) २०९५६ (०१-११-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी पोलीस वसाहतीतील सुरजमुखी, कृष्णकमळ, रजनीगंधा आणि पारिजात इमारतीतील उदवाहन (लिफ्ट) गत २ वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने इमारतीतील आबालवृद्धाची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई पोलीस विभागाकडून उद्वाहनाचे (लिफ्ट) देयक थकीत असल्याने संबंधित कंपनीकडून उद्वाहन बंद ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि वरळी पोलीस वसाहतीतील सुरजमुखी, कृष्णकमळ, रजनीगंधा आणि पारिजात इमारतीतील उदवाहन (लिफ्ट) तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) पोलीस वसाहतींच्या इमारतींची दुरुस्ती व देखभाल सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जाते. वरळी पोलीस वसाहतीतील चंद्रमल्लिका, सुरजमुखी, कृष्णकमळ, रजनीगंधा आणि पारिजात या एकूण ०५ इमारतीमधील एकूण १० उदवाहन यांची दुरुस्ती/ नुतनीकरण करण्याबाबतच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकास दिनांक ०४/१०/२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात ११ दहनघाटासाठी झाडांची कत्तल होत असल्याबाबत

**(२०) २२३७० (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात ११ दहनघाटासाठी लाकडांचा वापर होत असून गत अडीच वर्षात ३४,००० झाडांची कत्तल केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी २०२० ते जुलै, २०२३ या कालावधीत नागपूर महानगरपालिकेने दहनघाटासाठीच्या लाकडांवर रुपये १२ कोटी ९३ लाख ३४ हजार खर्च केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहनघाटासाठी लाकडांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्यामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबविणेकरीता विद्युतदाहिनीचा वापर प्रचलित करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या झाडांची कत्तल रोखण्यासाठी तसेच विद्युतदाहिनीचा वापर करणेकरीता महानगरपालिकेने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) नागपूर महानगरपालिकेव्दारे एकूण १९ दहनघाट/शवदाहिनी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. शवदहनाकरीता ८ दहनघाटामध्ये पारंपारिक पध्दतीने लाकडांचा वापर करण्यात येतो.

शवदहनाकरीता लाकडाचा वापर कमी व्हावा याकरीता २ दहनघाटावर डिझेल दहनघाट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ३ दहनघाटांवर एल.पी.जी. शवदाहिन्या उपलब्ध असून ४ दहनघाटांवर एल.पी.जी शवदाहिन्या उभारण्याची कार्यवाही सुरू आहे. ६ दहनघाटांवर बायोकोल ब्रिकेटचा वापर करण्याकरीता पिंजरे बसविण्यात आलेले असून या दहनघाटावर निशुल्क बायोकोल ब्रिकिटचा पुरवठा करण्यात येतो. या ६ दहनघाटावर लाकुडव्दारे शवदहन करण्याकरीता शुल्क आकारण्यात येते.

महानगरपालिकेच्या सर्व दहनघाटावर पर्यावरण पूरक पिंजरे बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.